**कनिष्ठ सहाय्यक (लेखा) दिव्यांग 1 पदाकरीता तात्पुरती अंतरीम पुरवणी निवड यादी**

| अ.क्र. | बैठक क्रमांक | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | दिव्यांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2840000145 | श्री दिपक शामराव काळे (दिव्यांग) | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (सर्वसाधारण) | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (दिव्यांग) | B (Deaf,Hard of Hearing) |

**कनिष्ठ सहाय्यक (लेखा) दिव्यांग 1 पदाकरीता तात्पुरती अंतरीम पुरवणी प्रतिक्षा यादी**

| अ.क्र. | बैठक क्रमांक | उमेदवारांचे नाव | प्रवर्ग | दिव्यांगत्वाचा प्रकार | निवड यादीतील प्रतिक्षा क्रम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2840000148 | श्री लवकेश विश्वनाथ पोफळे (दिव्यांग) (सर्वसाधारण) | इमाव | B (Deaf,Hard of Hearing) | दिव्यांग -1 |
| 2 | 2840000137 | श्री गोपाल निवृत्ती इढोळे (दिव्यांग) (सर्वसाधारण) | इमाव | B (Deaf,Hard of Hearing) | दिव्यांग -2 |

टिप - 1) जिल्हा परिषद वाशिम सरळसेवा पदभरती सन 2023 ची जाहीरात क्र.1/23 नुसार वित्त विभागाच्या कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदाकरीता 7 जागा भरण्यासाठी अंतरीम निवड व प्रतिक्षा यादी दिनांक 12/03/2024 रोजी जि.प.वाशिम चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यामधील दिव्यांग उमेदवारांची तात्पुरती अंतरीम पुरवणी निवड व प्रतिक्षा यादी आज रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

2) सद्यस्थितीत दिव्यांग प्रवर्गातील 3 उमेदवारांची तात्पुरती अंतरीम पुरवणी निवड व प्रतिक्षा यादी मध्ये निवड करण्यात आली आहे. त्यापैकी पहिला उमेदवार हा तात्पुरती अंतरीम पुरवणी निवड यादी मध्ये समाविष्ट झालेला असुन तो आर्थीक दृष्टया दुर्बल घटकामध्ये मोडतो. दिव्यांग प्रवर्गामधील दुस-या व तिस-या उमेदवाराची निवड ही तात्पुरती अंतरीम पुरवणी प्रतिक्षा यादीमध्ये केलेली असुन ते दोघेही इमाव प्रवर्गामध्ये मध्ये मोडतात.

3) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक 29/05/2019 मधील मुद्दा क्रं. 9 नुसार दिव्यांग व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतु दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात येतात. दिव्यांगासाठी आरक्षीत पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातुन करण्यात येतो. जसे अनुसुचीत जाती किंवा जमातीचा असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदुवर समाविष्ट करावे. तसेच अनुसुचीत जमातीचा उमेदवार असल्यास त्यासाठी विहीत केलेल्या बिंदुवर त्याच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या बिंदुवर व उमेदवार खुला असल्यास खुल्याच्या बिंदुवर दर्शविण्यात यावा. परंतु जेव्हा सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील एखाद्या उमेदवाराची निवड झाल्यास व त्या प्रवर्गाचा बिंदु रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या प्रवर्गाच्या रिक्त होणा-या बिंदुवर त्याचा समावेश करण्यात यावा. अन्य बिंदु वर त्याचा समावेश करण्यात येवु नये असे नमुद केले आहे.

4) त्यामुळे वरील प्रकाशित यादीतील क्र. 1 चा दिव्यांग उमेदवार श्री. दिपक शामराव काळे (आर्थीक दृष्टया दुर्बल घटक) योग्य कागदपत्रासह उपस्थित झाल्यास यापुर्वी 12/03/2024 रोजी आर्थीक दुर्बल घटकाच्या

प्रकाशित केलेल्या तात्पुरत्या अंतरीम निवड सुचीतील क्रमांक 1 चे उमेदवार श्री. अक्षय ज्ञानेश्वर देशमुख हे तात्पुरत्या अंतरीम प्रतीक्षा सुचीमध्ये क्रमांक 1 वर जातील. व त्यांच्या ऐवजी आर्थीक दुर्बल घटक या प्रवर्गाच्या तात्पुरत्या अंतरीम निवड यादीमध्ये क्रमांक 1 वर श्री. दिपक शामराव काळे यांचा समावेश करण्यात येईल. उपरोक्त अंतरीम पुरवणी निवड यादीतील श्री.दिपक शामराव काळे हे दिव्यांग उमेदवार हजर झाले नाही वा कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरले, तर यापुर्वी दिनांक 12/03/2024 ला प्रकाशित आर्थीक दृष्टया दुर्बल घटक यांची तात्पुरती अंतरीम निवड व प्रतीक्षा यादी यामध्ये कोणताही बदल होणार नाही.

5) उपरोक्त तात्पुरती अंतरीम पुरवणी निवड यादीतील श्री. दिपक शामराव काळे हे दिव्यांग उमेदवार हजर झाले नाही वा कागदपत्र पडताळणीत अपात्र ठरले, तर उपरोक्त तात्पुरती अंतरीम पुरवणी प्रतीक्षा यादीतील क्रमांक 1 चे दिव्यांग उमेदवार श्री. लवकेश विश्वनाथ पोफळे (इमाव) व क्रमांक 2 चे दिव्यांग उमेदवार श्री. गोपाल निवृत्ती इढोळे (इमाव) यांच्या पैकी गुणानुक्रमे व कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र उमेदवाराचा समावेश दिनांक 12/03/2024 रोजी प्रकाशित केलेल्या इतर मागास वर्ग सर्वसाधारण प्रवर्गातील तात्पुरती अंतरीम निवड यादीमध्ये क्रमांक 1 वर करण्यात येईल. व दिनांक 12/03/2024 ला प्रकाशित इतर मागास प्रवर्गाच्या सर्वसाधारण तात्पुरत्या अंतरीम निवड यादीतील श्री. रवी चिंतामण कळसाने यांचा तात्पुरत्या अंतरीम प्रतीक्षा यादीतील क्रमांक 1 वर समावेश करण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद वाशिम | सदस्य सचिव<br>जिल्हा निवड समिती तथा<br>उपमुख्यकार्यकारी अधिकारी (सा.)<br>जिल्हा परिषद वाशिम | सदस्य<br>जिल्हा निवड समिती तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद वाशिम | अध्यक्ष<br>जिल्हा निवड समिती तथा<br>जिल्हाधिकारी वाशिम |